# मनोगत

विश्वाचा विश्वरचिता आद्यगुरु शिवशंकर विश्वनाथ, माता पार्वती जगाची जगत्जननी या वंदनीय विश्वाचे माता, पिता यांच्या चरणी कोटी कोटी वंदन करतो. शिवपार्वतीचा लाडका बाळ श्रीगणराज गणपती या बुध्दीच्या विद्याच्या सागराला अंत:करणापासून दंडवत करतो. मला स्मरण शक्ति दिली मला सद्विचार शब्दरुपी ज्ञान देत गेले, म्हणून मी अभंग करु शकलो.

माझी प्रिय देवता विद्याची स्वामिनी माता शारदा माझ्या जिभेवर कृपेची छाया धरुन बसली होती. म्हणून मज अज्ञान जीवाकडून हे सत्कार्य करुन भक्ताला मोठेपणा देणारी, ईश्वरीय विद्याची शक्ति माता सरस्वती मला ज्ञान अमृत पाजून हे मंगल कार्य करुन घेत होती. मला कोणतेही व्याकरण भाषेचे ज्ञान नसतांना माता सरस्वतीने हे कार्य करुन घेतले. माझे हे खरचं परमभाग्य मी मानतो ह्या विद्यारुपी देवीला कोटी कोटी प्रणाम करतो.

माझा बुध्दीचा सागर गणपती मला बुध्दी आत्मसात करुन देत होते हा माझा आत्मविश्वास आहे. कारण मला ज्ञान नसतांना हे कार्य झाले त्याचे कारण, फक्त आणि फक्त इश्वरीय शक्ति असू शकते हा माझा विश्वास आहे. माझे मनोरथ पूर्ण झाले त्याचे साक्षी माझे श्रीराम भगवान ज्यांच्या नाममंत्राने माझी वाणी पवित्र झाली. ज्यांचे नाम विश्वाला मोहित करते व जड जीवांचा उध्दार करते. मुके ही बोलु लागतात अशा श्रीरामचंद्राला कोटी कोटी दंडवत करतो. माझे प्राणाचे मालक मला सद्बुध्दी, शक्ति, वाणी, प्रेरणा देणारे ज्याने श्रीरामाला त्याच्या भक्ति कार्याने मोहित केले असे विश्ववंदनीय भक्तिचे महामेरु, श्रीरामाचे परमभक्त, श्रीरामाच्या कार्यासाठी जीवनभर चिरंजीवी होवून कार्य करणारे श्रेष्ठ रामभक्त, अंजनीचा सुपुत्र, केशरीनंदन, वायुदेवाचा लाडका बाळ, माझे इष्ट दैवत, माझा प्राण, माझी भाग्यरेखा, माझे पूर्ण जीवन असणारे, साधुसंतांचे आदरणीय स्थान भक्ताचे संकटमोचन, भक्तासाठी लवकर मदतीला धावून येणारे माझे प्रिय दैवत, श्रीरामाची अजर अमर गाथा गाणारे माझे अस्तित्व, माझे हनुमंतराया या देवाच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम करतो व मनोगताला सुरुवात करतो.

ज्यांनी हे अनमोल जीवन दिलं, त्या माता-पित्याला अंत:करणापासून नमस्कार करतो व सद्गुरुंना साष्टांग दंडवत करतो. माझ्या प्रिय वाचक बंधू भगिनींना माझा सादर प्रणाम, माझ्या अंत:करणाचे दोन शब्द

## लेखकाचे दोन शब्द

माझ्या हृदयाचा राम म्हणजे रामनामाची अमृतधारा खंड -१, व खंड-२, आता तिसऱ्या खंडाचा माझा हा अनुभव खूप वेगळा आहे. ज्या वेळेस मी अभंग करतो तेच मला कळत नाही, माझ्या अंत:करणातून श्रीरामाचे चिंतन होते व हे अभंग मी टिपून घेतो खरचं, माझे अंत:करण हे बोलत आहे. मला मराठी नीट वाचता येत नाही. मला भाषेचे नियम, रचना, वाक्यप्रकार, आकार, उकार, वेलांटी अनुस्वार, गद्य, पद्य यापैकी व्याकरणाचा कोणताही अनुभव किंवा ज्ञान नाही तरी मला अभंग

करण्याची सद्बुध्दी दिली, हा सर्व विधी विधात्याचा खेळच म्हणावा कारण मला कोणत्याही गोष्टींचे ज्ञान नसतांना परमेश्वराने हे सर्व करुन घेतले व घेत आहे.

मला 'रामनामाची अमृतधारा खंड-३' हा ग्रंथ लिहितांना मला वाटे कुणीतरी अंत:करणातुन आवाज देत आहे, मनामध्ये परिवर्तन होत आहे. आपोआप शब्द सुचत जातात व त्या अनेक शब्दांचे वाक्यरुपाने अभंग तयार होतात हे मला कळत नव्हते. पण माझा हनुमंतावरचा अफाट आत्मविश्वास माझी भक्ति, प्रेम मला प्रोत्साहन देत होते. मला माझे पवित्र मन सांगत होते हे सर्व निराकार ईश्वराचाच खेळ व लिला आहे. माझ्या सारख्या अज्ञानी साधकाकडून हे कार्य करुन घेतले. असे खूप अनुभव आहेत. ते जीवनाला चांगली दिशा, प्रेरणा, ज्ञानबोध देतात. माझे भाग्य चांगले माझ्या मुखात श्रीरामाचे नाम आले व हनुमंताची भक्ति करण्याचे मला भाग्य लाभले हे सर्व ईश्वराच्या हातात आहे. माझ्या वाणीला मनाला प्रेरणा मार्ग देणारी शक्ति, म्हणजे आई, वडिलांची सेवा साधुसंतांप्रती प्रेम जिव्हाळा व माझे मार्गदर्शक गुरुवर्य स्वामी सागरानंद सरस्वती माझे मनोबल वाढवत गेले. या सर्व वंदनीय साधुसंतांचे आशीर्वाद मला लाभले म्हणूनच मी हा तिसरा खंड पूर्ण करु शकलो.

माझा भाव अंत:करणापासून निसर्गावर आहे. निसर्ग माझा प्राण माझा राम, हनुमंतराया व शिवभगवान आपुल्या तेहतीस कोटी देवदेवता व साडेतीन कोटी तीर्थ मी माझ्या निसर्गात पाहतो. निसर्ग हा पर्यावरणाच्या व पंचमहाभूतांच्या माध्यमातून हे कार्य घडवून आणतो. व जीव सृष्टीचे उत्थान होते. पर्यावरण हा आपल्या जीवनाचा खूप मोठा भाग आहे. आपण सर्व सजीव, प्राणी निसर्गाचे एक घटक आहोत म्हणून, पर्यावरण हे आपले जीवन जगण्यासाठी खूप महत्वाचे केंद्रबिंदू आहे.

श्रीराम शक्तिपीठात वृक्षारोपण व वृक्षांचे संगोपन केले जाते मला झाडे, वेली, पशु, पक्षी, गायीची सेवा आवडते म्हणून आश्रमात गौपालन केले जाते. गाय ही विश्वभूषण आहे व आपल्या देव देवतांचे अधिष्ठान आहे तेहतीस कोटी देवतांचे मंदीर म्हणजे गौमाता अंत:करणापासून या कामधेनूला शतश: प्रणाम करतो. 'झाडे लावा, झाडे जगवा' वृक्ष हे माणसाचे आरोग्य चांगले धष्टपुष्ट ठेवतो प्राणवायू पासून आपल्या बऱ्याच गरजा भागवून ते आपली मदत करतात. वृक्ष हा साक्षात शिवशंकर आहे व वेली हे पार्वतीचे स्वरुप आहे. वृक्षापासून आपणास प्राणवायु, अन्न, सावली, लाकूड, औषधी असे बरेच काही मिळते म्हणून आपण त्या निराकार भगवंताची जाणीव ठेवून निसर्गाची सेवा केली पाहिजे. आम्ही आश्रमात झाडे, वेली लावून निसर्गाची पूजा करतो व त्यांचे धन्यवाद मानून प्रेमभावे सेवा करतो.

माझे प्रिय, माझ्यावरती अफाट प्रेम करणारे मला गुरु मानुन माझा सन्मान करणारे शिष्य म्हणू का देव मलाच समजत नाही, हे गुरुप्रेमी, सिध्देश्वरानंद सरस्वती, श्रीनाथानंद सरस्वती, सुदर्शनानंद सरस्वती, विश्वेश्वरानंद सरस्वती आणि चि. आदित्य जाधव हे शिष्य फार ज्ञानी, निष्ठावान, गुरुप्रेमी आहेत, या साधकांनी मला ग्रंथासाठी अनमोल सहकार्य केले, मी अभंग सांगत होतो. हे साधक लिहून घेत होते, कधी कधी वेळेवर हे साधक नसतांना, मी स्वत: अभंग टिपून घेई. मला हा सुखमय अनुभव या

साधकांचा आला हे हनुमंताचे व श्रीरामाचे परमभक्त ही आहेत. त्यांना हनुमान चालिसा, रामरक्षा व राम नाम या विषयी खूप आवड आहे. माझे सहकार्य करणारे ह.भ.प. प्रभाकर महाराज खैरनार (पाळेकर) यांनी मला अनमोल सहकार्य केले. मी त्यांचा फार फार आभारी आहे व या निष्ठावान साधकांचाही ऋणी आहे. तसेच ग्रंथाच्या छपाईसाठी नाशिकचे 'आकृती आर्टस्' यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देतो व त्यांचाही आभारी आहे. त्यांना श्रीरामप्रभू, हनुमंतराय आशीर्वाद देतीलच देतील पण मी अंत: करणापासून त्यांचे ऋण व्यक्त करतो.

माझ्या वाचक बंधु भगिनींना हा ग्रंथ खूप आवडेल, हा ग्रंथ माझा प्राणच आहे कारण मी हा ग्रंथ लिहतांना खूप अनुभव अनुभवले ईश्वरीय शक्ति किती अफाट भक्तावर प्रेम करते, भक्तासाठी धावून येते. भक्ताला कार्यासाठी तत्पर राहून मदत करते हे मला अनुभवायला मिळाले, याचे वर्णन मी शब्दात करु शकत नाही. माझे हनुमंतराय माझे जीवन धन्य करणारे, माझे परम दैवत, या दैवताचे कितीही गुण गायीले ते माझ्यासाठी खूपच कमी आहे. हजारो जन्म घेवून सुध्दा या ईश्वराचे उपकार जीवनभर फेडू शकणार नाही, म्हणून फक्त आणि फक्त हनुमंताच्या चरणी लोटांगण घालतो व चरणी ठेवा ही विनंती करतो. हा ग्रंथ तुम्ही वाचुन संग्रहित ठेवावा. काही चुका असतील तर जरुर कळवा, आम्ही दुरुस्ती करु ही विनंती. हा ग्रंथ श्रीरामाच्या चरणी अर्पण करतो.

।। जय श्रीराम ।।

## ।। अभंग ।।

**रामा करितो मी हट्ट एक । तुम्ही व्हावे रामा प्रकाशक ।।१।।**
**रामा लिहुनिया अक्षरं दोन । त्यामध्ये साक्षात माझे राम रमण ।।२।।**
**कोणी करो काही रे विचार । रामा मी वाहिलं तुझ्या चरणी सारं ।।३।।**
**शब्द,अक्षर जोडिले तुला विचारुनी । रामा तुझ्याच कृपेची ही शुध्द वाणी ।।४।।**
**हनुमंतदास म्हणे, तुच साक्षी एक। माझा राम रे रघूनायक ।।५।।**

**हनुमंतदास**
श्री श्री १००८ महामण्डलेश्वर
स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज